'विवेकानंद' मध्ये मोडी लिपी ऑनलाईन प्रशिक्षणास सुरुवात

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

विवेकानंद कॉलेज मधील इतिहास विभागाच्या वतीने ऑनलाईन पद्धतीने एल. एम. एस प्लॅटफॉर्मद्वारे 'मोडी लिपी' हा मूक कोर्स आयोजित केला आहे.

मोडी लिपी ही मराठी भाषा लिहिण्यासाठी प्राचीन व मध्ययुगीन कालखंडात वापरली जाणारी लिपी होती. या कालखंडातील असंख्य कागदपत्रांचा म्हणजेच इनाम पत्रे, दानपत्रे, सात-बारा यासारख्या कागदपत्रांचा मोठा साठा उपलब्ध आहे. त्यातील माहिती समाजासमोर येण्यासाठी मोडी लिपीचा आधार घ्यावा लागतो.

मोडी लिपी येणाऱ्यांना अनेक रोजगाराच्या संधी उपलब्ध आहेत. इच्छुक विद्यार्थ्यांनी नोंदणी करून सहभागी व्हावे, असे आवाहन प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार व इतिहास विभागप्रमुख डॉ. एस. आर. कट्टीमनी यांनी केले आहे.

08/09/2023

7.9.23